स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या सामाजीकशास्त्र विद्याशाखे अंतर्गत इतिहास विषायतील पी.एच.डी. पदविच्या नियोजीत संशोधनासाठी सादर करावयाचा आराखडा

# “ महाराजा सयाजीराव गायकवाड व महाराष्ट्र यांचा संबंध: एक अभ्यास ”


संशोधक

मिलींद माणिकराव कांबळे (उमरीकर)

अजिंठानगर, हडको, परभणी

मार्गदर्शक

प्राचार्य. डॉ. आर. एस. फुन्ने

स्व. नितीन महाविद्यालय, पाथरी

ता.पाथरी जि.परभणी


जुलै - 2021

**महाराज सयाजीराव गायकवाड**

**1. प्रस्तावना :**

आधुनिक भारताचा विचार करताना आपल्याला ब्रिटीश राजवटीची आवर्जून दखल घ्यावी लागते. कारण भारतात आधुनिकतेचे वारे ब्रिटीश सत्तेमुळे वाहू लागले. युरोपच्या तुलनेत भारतात औद्योगिक क्रांतीचे परिणाम , एकाच ठिकाणी मोठ्या प्रमाणात उत्पादन करणारे कारखाने उशीराने सुरू झाले. भारतात ब्रिटीश सत्तेने आपल्या साम्राज्य विस्तारासाठी आधुनिकीकरणाचा पुरस्कार केला. आधुनिकीकरणाच्या सोयी भारतीयांना उपलब्ध करून देण्यामागे ब्रिटीश सत्तेचा हेतू हा भारताचे कसे अधिकाधिक आर्थिक शोषण करता येईल हा होता. आपल्या साम्राज्याचा सूर्य कधीच अस्तंगत होऊ नये याच मताचे ब्रिटीश अधिकारी होते. त्यांची ध्येय धोरणे देखील त्याच अनुषंगाने ठरत असत. 1757 ते 1857 या काळात येथील छोट्या मोठ्या राजांना परस्पर लढवून त्यांच्या फंदफितूरीचा फायदा घेत ब्रिटीशांनी जवळजवळ संपूर्ण भारतावर आपली सत्ता स्थापन केली. भारत हा मध्ययुगातील सम्राट अकबराच्या साम्राज्यानंतर परत एकदा एककेंद्री सत्तेखाली आला. ब्रिटीशांच्या अनिर्बंध सत्तेच्या कचाट्यात येथील गरीब, कष्टकरी, मध्यमवर्गीय ,आदिवासी, शेतकरी, कामगार वर्ग, भरडला गेला. व अशा अन्यायी सत्ताधिशांना उलथवून टाकण्यासाठी भारतात विविध प्रांतात उठाव झाले. याचे सर्वात मोठे उदाहरण म्हणजे 1857 चा उठाव.

उठावाच्या अपयशातून बोध घेऊन इंग्रती सत्तेच्या विरोधात भारतातील सर्व जनतेने एकसंघ होण्याची निकड येथील बुद्धिजीवी मध्यमवर्गाला झाली. त्यातून एक राष्ट्रीय पातळीवरचे संघटन जन्मास आले. तेच भारतीय राष्ट्रीय काँग्रेस होय. ब्रिटीशांच्या शिक्षण पद्धतीमुळे पाश्चात विचारांचे वारे भारतात वाहू लागले. यातूनच समाजवाद, लोकशाही , साम्यवाद, संसदीय लोकशाही या संकल्पनांची माहिती भारतीयांना होऊ लागली. ब्रिटीश भारतात या चळवळीत शैक्षणिक विचार संघटना या मोठ्या प्रमाणात वाढल्या परंतू भारतात असे काही प्रांत होते की या प्रांतावर भारतीय संस्थानिकांचे राज्य चालत असे. आधुनिक विचारांपासून संस्थानातील जनता दूर होती . अशा संस्थानिकांना ब्रिटीश अधिकारी बळ देत असत.कारण ब्रिटीश सत्तेला हे संस्थानिक आर्थिक व सैनिकी मदत पुरवीत असत. भारतातील अधिकांश संस्थानिक आपले

राजेपद व अधिकार अबाधित कसे राहतील याच मताचे होते. त्यांनी ब्रिटीश भारतातील स्वातंत्र्य चळवळीकडे मुद्दामहून दुर्लक्ष केले. प्रशासनात जनतेला प्रतिनिधीत्व किंवा नागरी हक्क या गोष्टींचा विरोध केला. काही बोटावर मोजता येणाऱ्या संस्थानिकांनी या सर्व घडामोडींचा विचार करून प्रशासनात तसेच नागरिकांना वेळोवेळी अधिकार बहाल केले. त्यात प्रामुख्याने कोल्हापूरचे संस्थानिक राजर्षी शाहू महाराज व बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांचा उल्लेख करता येईल.

आधुनिक भारताच्या इतिहासात परंपरागत पद्धतीने राजसत्तेवर येऊनही ज्यांनी आपल्या संस्थानात जे उपक्रम राबवले ते बघता तत्कालिन लोकशाही पद्धतीने राज्यकारभार करणाऱ्या ब्रिटीश सरकारलाही लाजवतील असे होते. म्हणून त्यांचा उल्लेख दृष्टे सुधारक राज्यकर्ते म्हणून करता येईल. इ.स.१८८५ हे भारतातील प्रबोधन युग सुरू होऊन राष्ट्रीय पातळीवर संघटन स्थापन होणारे वर्ष तर त्या आधि 10 वर्षापूर्वी म्हणजेच इ.स.1875 हे वर्ष आधुनिकतेची कास धरून आपले संस्थान सुधारणाऱ्या महाराज सयाजीरावांच्या सत्तारोहणाचे वर्ष. पुढील 64 वर्ष त्यांनी आपल्या युरोप अमेरिका इ. विविध देशातील पर्यटनातून जे जे चांगले ते ते संस्थानात रुजवीण्याचा प्रयत्न केला. यातूनच बडोद्याचे शैक्षणिक,आर्थिक, राजनैतिक दृष्ट्या त्यांच्या कार्यात झालेली भरभराट नजरेत भरणारी अशी होती. ही भरभराट पाहून येथील ब्रिटीश सत्तेलाही असूया होत असे.

प्रस्तूत शोध प्रबंधाच्या माध्यमातून महाराज सयाजीराव गायकवाड यांनी कारकीर्दीच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सामाजिक ,राजकीय, स्वातंत्र्य चळवळीला तसेच शैक्षणिक व पुरोगामी चळवळींना कसा पाठींबा व आर्थिक सहाय्य केले याचा आढावा संशोधनाच्या माध्यमातून घेण्याचा प्रयत्न आहे.

## 2. विषय निवडी बाबत :

प्रस्तूत विषय निवडीबाबत असे स्पष्ट करता येईल की, स्वातंत्र्य चळवळीच्या काळात जी काही प्रमुख संस्थाने होती त्यात बडोदा संस्थानाने विविध क्षेत्रात आपल्या योगदानाचा ठसा उमटवल्याचे दिसून येते. मग ते स्वातंत्र्य चळवळीशी संबंधित असो की, सामाजिक, शैक्षणिक ,राजकीय,आर्थिक इ.क्षेत्राशी संबंधती असो. या प्रत्येक क्षेत्रात महाराज सयाजीराव गायकवाड यांनी भरीव असे योगदान दिल्याचे दिसून येते. धार्मिक सहिष्णुता, आधुनिकतेचे पुरस्कर्ते, मातृभूमि विषयी जाज्वल्य अभिमान असणारे ,मानवतावादी, लोकशाही समर्थक अशा विविध भूमिकेतून ते आपल्या समोर येतात त्यांच्या

या कार्याचा तसेच आजपर्यंत प्रकाशात न आलेल्या विविध पैलूंचा आढावा घेण्याच्या प्रयत्न प्रस्तूत विषय निवडी मागे असून त्यांच्या सामाजिक, आर्थिक, आणि राजकीय क्षेत्रातील योगदानाचा तत्कालिन महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनाच्या किंवा एकंदरीतच समग्र महाराष्ट्राच्या जडणघडणीत कसा प्रभाव पडला त्याचा अभ्यास या निमित्ताने नव्या पिढीसमोर ठेवण्याचा  प्रयत्न संशोधन विषयाच्या निवडीमागे आहे .

## 3. संशोधनाच्या मर्यादा :

इ.स. 1863 ते 1939 या दरम्यानच्या म.सयाजीराव गायकवाड यांच्या सामाजिक, शैक्षणिक,आर्थिक आणि राजकीय क्षेत्रातील योगदानाचा अभ्यास करणे.

इ.स.1863 11 मार्च हा सयाजीराव गायकवाड यांचा जन्म असून इ.स.1939 6 फेब्रुवारी रोजी त्यांचे निधन झाले. असे एकंदरीत 76 वर्षाचे आयुष्यमान त्यांना लाभले.

## 4. साधन चिकित्सा :

महाराज सयाजीराव गायकवाड व महाराष्ट्र यांचा संबंध : एक अभ्यास या संशोधन विषयासाठी मूळ अप्रकाशित साधनांमध्ये म.सयाजीराव गायकवाड यांचा खाजगी पत्रव्यवहार, निरनिराळे पत्रके, बडोदा गॅझेटीयर, अप्रकाशित साधने, तसेच प्रकाशित साधनामध्ये त्यांच्यावर लिहिलेले चरित्रात्मक ग्रंथ, विशेषांक,इ.चा उपयोग केलेला आहे.

## 5. पूर्वसंशोधनाचा आढावा :

म.सयाजीराव गायकवाड यांच्यावर चरित्रात्मक ग्रंथ दादूमियाँ, व्ही.के.चावडा, पेंडसे, इ. लेखकांनी लिहिले आहेत. परंतू मी जो विषय संशोधनातून पुढे आणत आहे तो प्रथमताच संशोधनाच्या माध्यमातून पुढे येत आहे. या संशोधन प्रबंधाने भावी पिढ्यांना निश्चितच मोलाचे मार्गदर्शन होईल.

## 6. संशोधन पद्धती :

प्रस्तावित संशोधनात म.सयाजीराव गायकवाड व महाराष्ट्र यांचा संबंध एक अभ्यास विषयक कार्याचा व्यष्टी अध्ययन पद्धतीच्या अनुषंगाने हा अभ्यास करावायाचा आहे. संशोधनाकरिता आंतर विद्याशाखीय अर्थातच एकिकृत संशोधन पद्धतीचा वापर करावा लागणार आहे . यासाठी ऐतिहासिक वर्णनात्मक पद्धतीचा व तौलनिक पद्धतीचा वापर करणार आहे. संशोधनाच्या इतरही पद्धती आहेत परंतू वरील पद्धती माझ्या संशोधनासाठी उपयुक्त आहे. म्हणून याच संशोधन पद्धतींच्या आधारे मी संशोधन करणार आहे.

## 7. संशोधनाची उद्दिष्ट्ये :

1. म.सयाजीराव गायकवाड यांच्या धोरणांचा महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनावर झालेल्या परिणामांचा शोध घेणे.
2. म.सयाजीराव गायकवाड यांच्या शैक्षणिक उपक्रमांचा महाराष्ट्राच्या उपेक्षित व दुर्बल घटकातील समाजावर झालेल्या परिणामांची माहिती घेणे.
3. म.सयाजीराव गायकवाड यांच्या पुरोगामी धोरणामुळे महाराष्ट्रातील ब्राह्मणेत्तर चळवळीला लाभलेल्या नेतृत्वाचा आढावा घेणे.
4. म.सयाजीराव गायकवाड यांनी महाराष्ट्रातील क्रांतीकारी चळवळींना पाठींबा दिला याची माहिती घेणे.
5. भारतीयांना आधुनिक दृष्टी देणारे नेतृत्व म्हणून म.सयाजीराव गायकवाड यांच्या कार्याचा आढावा घेणे.
6. दुर्बल घटकांच्या आर्थिक उन्नतीसाठी राबवलेल्या योजनांचा आढावा घेणे.

## 8 संशोधनाची गृहितके :

1. म.सयाजीराव गायकवाड यांनी सामाजिक सुधारणेला प्राधान्य दिले.
2. म.सयाजीराव गायकवाड यांनी महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळींना पाठींबा दिला.
3. प्राचिनकालिन कुप्रथा ,रूढी पंरपरा, जातीभेद, अस्पृश्यता, स्त्री - पुरूष भेद यांना त्यांनी विरोध केला.
4. महाराष्ट्रातील ब्राह्मण ,ब्राह्मणेत्तर चळवळींना दिलेला पाठींबा
5. आर्थिक दृष्ट्या मागास समाजाला प्रमुख प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी वेळोवेळी चालवलेले उपक्रम.
6. सामाजिक विषयमत दूर करण्यासाठी शिक्षणाच्या माध्यमातून अंधश्रद्धा व जातीभेद नष्ट करण्याचा केलेला प्रयत्न.

## 9. नियोजित प्रकरण योजना :

1. म.सयाजीराव गायकवाड : व्यक्ती व कार्य
2. म.सयाजीराव गायकवाड कालिन महाराष्ट्राची स्थिती
3. म.सयाजीराव गायकवाड  यांचे शैक्षणिक कार्यातील योगदान
4. म.सयाजीराव गायकवाड यांनी महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीतील नेतृत्वाला दिलेला पाठींबा
5. म.सयाजीराव गायकवाड यांच्या शैक्षणिक धोरणांमुळे महाराष्ट्रातील सामाजिक व राजकीय चळवळीला लाभलेले नेतृत्व

6. उपसंहार / नष्कर्ष

संदर्भ सूची :-

प्रथमिक साधने


1. चावडा व्ही.के. 1987, प्र. आ. सयाजीराव गायकवाड नॅशनल बुक ट्रस्ट, नवी दिल्ली.
2. दादूमियाॅ 2010, प्र.आ.श्रीमंत सयाजीराव गायकवाड, गंधर्ववेद प्रकाशन, सदाशिवपेठ, पुणे
3. डॉ. बाबा भांड 2012, प्र.आ. युगदृष्टा महाराजा,साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
4. पेंडसे सी.वा. बडोदे राज्याचा इतिहास.
5. अग्निहोत्री गणेश. 2003, श्रीमंत महाराजा सयाजीराव गायकवाड, शिव पब्लिकेशन, पुणे.
6. पवार निंबाजीराव.1986, जेंव्हा गुराखी राजा होतो,राजहंस प्रकाशन, पुणे.
7. पाटील उल्हास. 2014, लोकराजा महाराजा सयाजीराव गायकवाड, कबीर प्रकाशन,संगमनेर.
8. बेलसरे चंद्रलेखा. 2015, लोकनायक महाराजा सयाजीरा गायकवाड.चपराक प्रकाशन, पुणे.
9. नेने.दा.वी. 2010, श्रीमंत महाराजा सयाजीराव गायकवाड, गंधर्ववेद प्रकाशन, पुणे.
10. बाबा भांड. सयाजीराव गायकवाड, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद
11. बाबा भांड. 2013, महाराजा सयाजीराव विचारधन साकेत प्रकाशन औरंगाबाद
12. डॉ. के.के.चौधरी, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास खंड - 1 प्रकाशन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
13. सुहास कुलकर्णी, मिलींद चंपानेरकर, यांनी घडवले सहस्त्रक  रोहन प्रकशन पुणे.
14. हरी नरके, शोधाच्या नव्या वाटा, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ